Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र./कोविमं/माध्य.गोप./ 219
कोल्हापूर-०४
दि. १७/०१/२०२५ 20

प्रति,

केंद्र संचालक,

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२५.

**विषय :- फेब्रु-मार्च २०२५ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या सेंटर समरी (AB LIST) बाबत.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२५ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी आपल्या परीक्षा केंद्रावर प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची संगणकावर तयार करण्यात आलेली सेंटर समरी (AB LIST) आपल्या उपयोगासाठी सोबत पाठविण्यात येत आहे. सदरहू सेंटर समरी रिपोर्ट मध्ये आपल्या परीक्षा केंद्रावर दिनांक व सत्रनिहाय, विषय व माध्यमातून प्रविष्ठ होणारी विद्यार्थी संख्या, त्याप्रमाणात प्रश्नपत्रिकांची संख्या, इत्यादी माहिती नमूद केलेली आहे. त्या आधारे आपल्या केंद्रावरील बैठक व्यवस्थेनुसार प्रत्येक ब्लॉकमध्ये प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना विषयनिहाय व माध्यमनिहाय लागणाऱ्या एकूण प्रश्नपत्रिकांची संख्या (पाकीटे) परीक्षेच्या वेळी उपलब्ध करून घेणे सुलभ होईल. तरी मंडळामार्फत आपल्या उपयोगासाठी देण्यात आलेली सेंटर समरी रिपोर्ट (AB LIST) नुसार, परिरक्षकामार्फत पुरविण्यात येणाऱ्या पाकिटांबाबत सर्व केंद्र संचालकांनी खात्री करुनच पाकिटे ताब्यात घ्यावयाची आहेत आणि त्यानंतर ती दिनांक, विषय व माध्यमनिहाय पर्यवेक्षकास वितरित करावीत व त्याप्रमाणे वितरणाबाबत सूचना देण्यात याव्यात.

सेंटर समरी रिपोर्ट (AB LIST) आपणास परीक्षा सुरु होण्यापूर्वीच देण्यात येत असल्याने त्या अनुषंगाने आपल्या परीक्षा केंद्रावर प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना विषयनिहाय व माध्यमनिहाय पुरेशा प्रश्नपत्रिका उपलब्ध आहेत का याची खात्री करुन घ्यावी. प्रश्नपत्रिका कमी पडतील असे आढळून आल्यास तात्काळ विभागीय मंडळातील विभागीय अध्यक्ष, विभागीय सचिव त्याचबरोबर सहसचिव यांचेशी संपर्क साधावा. लिपिक किंवा शिपाई यांचेकडे निरोप देवू नये.

प्रत्यक्षात पेपरचे वेळी देखील परिरक्षकांमार्फत पुरविण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांचे मुख्य पाकिट फोडल्यानंतर आतील छोटया पाकिटांच्या विंडोमध्येही त्याच विषयाच्या व माध्यमाच्या प्रश्नपत्रिका आहेत का याची तपासणी करावयाची आहे. त्याचबरोबर प्राप्त झालेली प्रश्नपत्रिकांच्या पाकिटांची संख्या व त्यावरील तपशील इ. सर्व माहिती सेंटर समरी रिपोर्ट प्रमाणे तपासून घ्यावी.

...२

**जर विंडो पाकिटामधून वेगळया प्रश्नपत्रिका आल्या असतील तर अशी विंडो पाकिटे न फोडता कार्यालयाशी संपर्क साधावा. कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिका कमी पडणार नाहीत याची दक्षता घ्यावी.**

आपल्या केंद्रास देण्यात येणारे फॉर्म व कागदपत्रे (उदा. फॉर्म नं. 1,2 इ.) यांचा एकच बंच करून सहाय्यक परिरक्षकाकडे इतर फॉर्मसोबत सुपूर्द करण्यात यावेत. तत्पूर्वी फॉर्म नं. 1,2 मध्ये विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरी व गैरहजेरी यांच्या नोंदी झाल्या आहेत का तसेच त्यामध्ये अतिरिक्त बैठक क्रमांकाने प्रविष्ठ विद्यार्थ्यांची नोंद झाली आहे का याची पडताळणी करावी. तसेच फॉर्म नं. 3 आपल्याकडे जतन करून ठेवण्यात यावा.

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक :**
**कार्यालय : (०२३१) २६९६१०१ / १०२ / १०३.**
**विभागीय सचिव : मो.- ९९२२५५४३४३**
**(०२३१) २६९१४०५**
**सहसचिव : मो.- ९४२११८६७५३**
**सहाय्यक सचिवः मो.- ९८९०७७२२२९**

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत - माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी,
सर्व परिरक्षक, फेब्रु-मार्च २०२५ परीक्षा